**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. १३**
**सभावृत्तांत**

दिनांक :- २५/३/२०१५ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २५/३/२०१५ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ओव्हाळ शेखर अशोक अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा. शमीम पठाण
४. मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा. शिदे शितल उर्फ विजय गोरख
८. मा.गावडे जयश्री वसंत
९. मा.साबळे छाया जगन्नाथ
१०. मा. जगताप विमलताई सुरेश
११. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१२. मा.बारणे निलेश हिरामण
१३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१४ मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१५. मा.कलाटे स्वाती मयुर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. सुभाष सावन माछरे - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव -,.प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. रविंद्र दुधेकर - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एस.एस.मोरे – कार्यकारी अभियंता विदयुत , मा. के.डी.फुटाणे - उप अभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.व्ही.एन.देसले- उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग मा.एम.एम.चव्हाण, उपअभियंता, विदयुत विभाग, ,मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, , मा.जे.एन.जानकार – सहा.आरोग्याधिकारी, मा.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, मा. व्ही.ए शेलार – हॉल्टीकल्चर सुपरवायझर, उदयान विभाग, श्री.आर.बी.चांदेरे, - उदयान सहाय्यक , उदयान विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. १२, दिनांक १८/२/२०१५, , २५/२/२०१५, २/३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २ चिंचवड पवनानगर बॅडमिंटन हॉल शेजारी नव्याने तयार केलेल्या गार्डनला गुरुवर्य – तुळशीराम तरोडे स्मृती उदयान असे नांव देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ३ चिंचवड येथील दशक्रीया विधी घाटावरील व्यासपीठास जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज व्यासपीठ असे नाव देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ४ वाकड प्रभाग क्रमांक ५३ मधील विविध रस्ते व लोकवस्त्यांना नांव देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ५ चिंचवडगांव पडवळ आळी याठिकाणी ज्येष्ठ नागरीकांसाठी बसण्याची व्यवस्था करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ६ थेरगांव येथील काळेवाडी फाटा चौकातील नानासाहेब धर्माधिकारी उडउण पुलाजवळ महिला व पुरुषांसाठी स्वच्छता गृह बांधणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ७ चिंचवडेनगर मधील विश्वेश्वर मंदिरासमोरील रस्त्याला कमान करुन त्या कमानीस गिरीराज विश्वेश्वर मंदीर नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ८ चिंचवडगांवातील पार्वती उदयानाजवळील मुतारी काढून टाकणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ९ महावितरणाच्या ओव्हर हेड वायर अंडर ग्राऊंड करणेकामी मनपाने त्याचेकडून खोदाईचे पैसे घेवू नये यासंबंधीचे प्रस्तावास मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १० ब प्रभाग मिटींग सभागृहामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे तैल चित्र लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विंचार करणे

विषय क्रमांक ११ पिंपरी भाजीमंडई येथील पुलाखालील आरोग्य कोठी व जुना जकात नाका येथील जागा व्यापा-यांना भाडे तत्वावर देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

ठराव क्र. ४० विषय क्र. १

दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.यमुनाताई पवार अनुमोदक: मा. आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा.माया संतोष बारणे यांचा दि. ५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५१ मधील कॉलनी यांना १) शिवांकुर कॉलनी-पुरोहीत स्वीट होम मागे २) आनंदबाग कॉलनी लेन नं.१ ३) आनंदबाग कॉलनी लेन नंबर २ नांवे देण्यासाठी पाटया लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४१ विषय क्र. २

दि. २५/३/२०१५ विभाग : १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय, २) स्थापत्य उदयान ३) उदयान विभाग

सुचक : मा.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा.अँड. संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.सौ.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि.२५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड , पवनानगर बॅडमिटन हॉल शेजारील मोकळया जागेमध्ये उदयान विभागामार्फत नव्याने उदयान विकसित करण्यात आलेले आहे. त्यांस गुरुवर्य – तुळशीराम तरोडे स्मृती उदयान असे नाव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४२ विषय क्र. ३

दि. २५/३/२०१५ विभाग : १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय २) वैदयकिय

सुचक : मा.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा.अँड. संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.सौ.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि.२५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड येथे दशक्रिया विधी घाटावर धार्मिक व आध्यात्मिक प्रवचने होत असतात. त्याकरीता बांधलेल्या व्यासपीठास जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज व्यासपीठ असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४३ विषय क्र. ४

दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य – ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड अनुमोदक: मा. अँड. संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.विनायक गायकवाड यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक ५३ वाकड मधील असलेल्या रस्त्याना व लोकवस्त्यांना खालीलप्रमाणे नांवे देण्यात यावीत. १) मनोहर पार्क ते शि वाजी चौक ते वाकड रोड या रस्त्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग असे नांव देणेस २) पोलीस वसाहतला जाणा-या रस्त्याला शहीद अशोक कामठे मार्ग असे नांव देणेस ३) स.नं.१५३/१ ब/२ मधील असणा-या टिप-टॉप हॉटेलच्या पाठीमागील बाजूस भंडारी इस्टेट असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४४ विषय क्र. ५
दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. अँड. संदिप चिंचवडे अनुमोदक: मा. विनायक गायकवाड

संदर्भ :- मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि.२५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

चिंचवडगांव पडवळ आळी याठिकाणी आरोग्य विभागाचे ऑफीसच्याजवळ मोकळी जागा असून याठिकाणी बाजूचे काही नागरीक कचरा टाकतात तसेच या जागेवर अतिक्रमण देखील होण्याची शक्यता आहे तरी सदर ठिकाणी या भागातील ज्येष्ठ नागरीकांसाठी बसण्याची व्यवस्था करावी व त्याठिकाणी वाचनालय करण्यात यावे जेणेकरुन तो भाग स्वच्छ राहील.

सबब लवकरात लवकर याठीकाणी सुशोभीकरण करणेस व नागरीकांना बसण्याची व्यवस्था करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य

--------

ठराव क्र. ४५ विषय क्र. ६
दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. विमल सुरेश जगताप अनुमोदक: मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

संदर्भ :- मा.विमल सुरेश जगताप यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

थेरगांव येथील काळेवाडी फाटा चौकातील नानासाहेब धर्माधीकारी उडडाण पुलाखाली दिवसेंदिवस खुप रहदारी वाढत असून, नागरीकांची खुप वर्दळ असते. सदर ठिकाणी स्वच्छता गृहाची आवश्यकता असून महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वच्छता गृह करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४६ विषय क्र. ७
दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी अनुमोदक: मा. जयश्री वसंत गावडे

संदर्भ :- मा. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

चिंचवडेनगर मधील विश्वेश्वर मंदिरासमोरील रस्त्याला कमान करुन त्या कमानीस गिरीराज विश्वेश्वर मंदिर असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र. ४७ विषय क्र. ८
दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.अँड. संदिप चिंचवडे अनुमोदक: मा. विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव

चिंचवडगांवातील मारुती उदयान जवळील जागेत उदयानाच्या शेजारीच दोन मुता-या बसविलेल्या आहेत. लहान मुले उदयानात खेळायला येत असतात त्याठीकाणी अस्वच्छता झालेली आहे. सबब सदरच्या मुता-या काढण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४८ विषय क्र. ९

दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य – ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अनंत सुभाष को-हाळे अनुमोदक: मा. विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

महावितरणाच्या ओव्हर हेड वायर अंडरग्राऊंड करण्यासाठी आधी मनपाने पुर्ण खर्च करुन म्हणजे (वायर खडडे खोदणे, जोडणी) हा खर्च करुन मनपा हददीतील वायर अंडरग्राऊंड केलेल्या आहेत. परंतु काही ओव्हर हेड लाईन अजूनही अंडरग्राऊंड केलेल्या नाहीत त्या उरलेल्या ओव्हर हेड लाईन अंडर ग्राऊंड करण्यासाठी एमएसईबी वायर व खोदकाम करण्यास तयार असून, मनपाने त्यांचेकडून खोदाईचे पैसे घेवू नये जेणेकरुन संपुर्ण शहर सुंदर दिसेल व पावसाळा चालु होण्या आधी सदरचे काम करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र. ४९ विषय क्र. १०

दि. २५/३/२०१५ विभाग : स्थापत्य –ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अनंत सुभाष को-हाळे अनुमोदक: मा. विनय उर्फ विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

ब प्रभागाची मिटींग ज्या सभागृहामध्ये होते त्या सभागृहाचे नांव छत्रपती शिवाजी महाराज सभागृह हे आहे. आणि म्हणूनच या सभागृहात महाराजांचे तैलचित्र लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

---------

ठराव क्र. ५० विषय क्र. ११

दि. २५/३/२०१५ विभाग : भूमी आणि जिंदगी विभाग (मुख्य कार्यालय)

सुचक : मा.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी अनुमोदक: मा.शेखर अशोक ओव्हाळ

संदर्भ :- मा.गुरुबक्ष पहलानी यांचा दिनांक २५/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी भाजी मंडई येथील पुलाखाली आरोग्य कोठी व जुनाजकात नाका येथील व्यापारांना सदरची जागा भाडे तत्वावर देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वोनुमते मान्य झाला

-----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.सभाध्यक्ष ओव्हाळ शेखर अशोक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ ओव्हाळ शेखर अशोक ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/ ९० /२०१५.
दिनांक : ३० / ०३ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना